# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी मा. श्री संजय कुमार, अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) **मा. श्री संजयकुमार, भाप्रसे,**
अपर मुख्य सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन तथा अध्यक्ष, कार्यकारी समीती

२) **मा. श्री संजयकुमार, भाप्रसे,**
अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन तथा सदस्य, कार्यकारी समीती

३) **मा. श्री नितीन करीर, भाप्रसे,**
**अपर मुख्य सचिव**, नगर विकास विभाग–१, मंत्रालय, महाराष्ट्र शासन तथा सदस्य, कार्यकारी समीती.

४) **मा. श्रीमती शीतल तेली–उगले, भाप्रसे,**
महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य, कार्यकारी समिती

५) **श्री हेमंतकुमार पवार**, अपर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य सचिव, कार्यकारी समिती

६) **श्री हेमंत ठाकरे,** मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य, कार्यकारी समिती.

सदर बैठकीत खालील विषयावर चर्चा झाली व निर्णय घेण्यात येऊन ठराव पारीत केले.

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आज शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या ७ व्या बैठकीचे इतिवृत्त.

| अ. क्र. | ठराव क्रमांक | विषय | ठराव / निर्णय | अंमलबजावणी करणारा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | ०१/०७/२०.१२.२०१९ | शनिवार, दिनांक ०४ मे, २०१९ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या सहाव्या बैठकीतील निर्णय, इतिवृत्त व अनुपालन अहवाल माहिती व मंजुरीकरिता ठेवण्याबाबत. | विषय मान्य करण्यात आला. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| २ | ०२/०७/२०.१२.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात अभिन्यास प्रस्ताव, इमारत बांधकाम मंजूरी आणि दिनांक ३१/०८/२०१० पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर अभिन्यासातील भूखंडके मुक्त करण्याकरिता आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्काबाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रस्तावात विकास शुल्क असा उल्लेख केलेला आहे. तथापि, हे विकास शुल्क नाही. या संदर्भात परिपूर्ण आकडेवारी व कारणमिमांसा देऊन उचित प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | ०३/०७/२०.१२.२०१९ | नागपूर येथे १००० क्षमतेच्या नवीन शासकीय मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाचे इमारत बांधकाम (विद्युतीकरण वगळून) कामाच्या निविदा रद्द करण्याबाबत. | विषय मान्य करण्यात आला. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ४ | ०४/०७/२०.१२.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत क्षेत्रात नोंदविल्या जाणाऱ्या दस्तांसाठी जिल्हा परिषदेला प्राप्त होणाऱ्या १% अतिरिक्त मुद्रांक शुल्का पैकी २५% रक्कम नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास मिळणे बाबत चा प्रस्ताव शासनास पाठविण्या करिता कार्यकारी समितीची मंजूरी मिळणे बाबत. | शासनास प्रस्ताव सादर करण्याकरिता मान्यता प्रदान करण्यात आली. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ५ | ०५/०७/२०.१२.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेत विकास परवानगी प्रदान करतांना Modification (SM-4) अनुसार ६०.०० मी. रूंद बाहयवळण रस्त्यापासून (Outer ring road) २५०.०० मी. अंतरात असलेल्या जागेवर विकास परवानगी देतांना आकारण्यात येणारे Corridor Development Charges रू. ५०.०० लक्ष पेक्षा अधिक होत असेल तर अशा प्रकरणात हप्ते (Installment) रक्कम घेवून व नामप्रविप्रा चे हक्क अबाधित ठेवून विकास परवानगी देण्याबाबत. | विषय मान्य करण्यात आला. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | ०६/०७/२०.१२.२०१९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे करण्यात आलेली गुंतवणूक. | प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीचा फेर आढावा घेऊन जोखीम व वित्तीय हानी याबाबत वित्तीय सल्लागाराचे मार्गदर्शन घ्यावे व पुनर्गुंतवणूकीबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| | | **वेळेवर येणारे विषय** | | |
| १ | ०७/०७/२०.१२.२०१९ | सहाय्यक संचालक, नगर रचना संवर्गातील एक पद भरण्यास मान्यता मिळण्याबाबत. | शासनाने मान्यता प्रदान केल्याप्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये एकूण ३५९ पदांपैकी सहाय्यक संचालक, नगर रचना या संवर्गातील दोन पदांना मान्यता प्रदान केलेली आहे. तथापि, दिनांक ४ जुलै, २०१९ रोजी संपन्न झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत तातडीने आवश्यक पद संख्येचा विचार केला असता, सहाय्यक संचालक, नगर रचना या संवर्गातील एकच पद भरण्यास प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झालेली आहे.<br>श्री. अमर पाटील हे सहाय्यक संचालक, नगर रचना या पदावर दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ पासून कार्यरत आहेत. त्यानंतर शासन आदेश दिनांक २०.०९.२०१९ अन्वये श्री. शैलेंद्र सारंग आवळे यांचीही शासनाने प्रतिनियुक्तीने सहाय्यक संचालक, नगर रचना या पदावर नियुक्ती केली आहे. मात्र प्राधिकरणाने एकाच पदास मान्यता प्रदान केलेली असल्याने, श्री. शैलेंद्र सारंग आवळे यांना रुजू करुन घेता आले नाही. श्री. शैलेंद्र सारंग आवळे हे सुमारे तीन महिन्यापासून रुजू होण्याच्या प्रतिक्षेत आहेत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कामाचा व्याप लक्षात घेता व श्री. शैलेंद्र सारंग आवळे, सहाय्यक संचालक, नगर रचना यांना सेवेत सामावून घेणे आवश्यक असल्याने, मुळ आकृतीबंधानुसार असलेल्या सहाय्यक संचालक, नगर रचना या दुसऱ्या मंजूर पदावर नियुक्तीस कार्यकारी समिती शिफारस करीत आहे, मात्र यास प्राधिकरणाची/मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची मान्यता घेण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. | |

मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने बैठक संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

(संजय कुमार)
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(हेमंतकुमार पवार)
अपर आयुक्त तथा सदस्य सचिव,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण